MHNG180007422022

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ८९/२०२२**
**तेजराम वि. दिपाली व १**

**<u>निशाणी क्र. १० वरील आदेश</u>**
**(उद्घोषणा दिनांक १६ जुन, २०२३)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी त्यांची मुलगी व मुलगा यांच्याकडुन उदरनिर्वाह भत्ता मिळण्यासाठी केलेला असुन अर्जदार यांनी त्यांच्या संपत्तीची त्यांच्या सर्व वारसांमध्ये तोंडी वाटणी केलेली असुन त्यांनी गैरअर्जदार यांनाही त्यांच्या खर्चासह कशी मदत केलेली आहे याबाबतची कथने अर्जामध्ये केलेली आहेत. गैरअर्जदार यांनी दिलेल्या वाईट वागणुकीमुळे अर्जदार यांचे जीवन दुख:द झाले असुन गैरअर्जदार क्र. २ यांना दररोज दारू पिण्याचे व्यसन आहे, तो अश्लील भाषा वापरतो व छोटया कारणाने भांडण करतो, तो अर्जदार यांना अमानुषपणे मारहाण करत असत. त्यामुळे अर्जदार यांना तो त्यांना मारूण टाकेन अशी भीती वाटते. त्यांना उदरनिर्वाहाचे साधन नाही. गैरअर्जदार यांचेकडे उदरनिर्वाहाचे व अर्जदार यांना सांभाळण्याचे साधने आहेत. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडे उदरनिर्वाह भत्ता मागण्यासाठी वकीलांमार्फत नोटिस पाठविलेली होती. परंतु गैरअर्जदार क्र. १ यांनी तिला खोटे उत्तर दिले. अशा प्रकारचे कथने करून अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याकडुन प्रतिमाह रू. २०,०००/- उदरनिर्वाह भत्ता मागितलेला असुन मुळे अर्जावर आदेश होईपावेतो अंतरिम आदेश करण्याची मागणी केलेली आहे.

२. गैरअर्जदार यांचे उत्तर नि.क्र. ९ वर आहे. त्याद्वारे त्यांनी अर्जातील त्यांच्या विरोधातील आरोप नाकारलेले आहेत. अर्जदार हे त्यांना बालपणीच सोडुन गेले असुन त्यांचे दुस-या स्त्रीसोबत अनैतिक संबंध आहेत व ते तिच्यासोबत राहत आहेत. त्यामुळे त्यांना गैरअर्जदार यांनी वाईट वागणुक देण्याचा प्रश्नच आलेला नाही. गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्या

विरूध्द वाटपाचा दावा दाखल केल्यानंतर त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याचे त्यांचे कथन आहे. अर्ज नामंजुर करावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

**३.** अर्जदार यांच्यातर्फे सुविज्ञ वकील श्री. एन.डी.अंजनकर व गैरअर्जदार यांच्यातर्फे श्री. गिरडकर यांचे युक्तीवाद ऐकले. माझ्या समक्ष पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्यांवरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र** | **... मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचा सांभाळ करण्यास कसुर केला आहे असे अर्जदार प्रथमदर्शनी सिध्द करतात काय ? | ... नकारार्थी |
| २. | अर्जदार अंतरिम आदेश करून मिळणेस पात्र आहेत काय ? | ... नकारार्थी |
| ३. | अंतिम आदेश कोणता ? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**४.** नातेसंबंध अविवादीत आहेत. अर्जदार व गैरअर्जदार हे सोबत राहत नाही ही बाब सुध्दा अविवादीत आहे.

### <u>मुद्दा क्र. १ बाबत</u>

**५.** फौजदारी प्रक्रीया संहिता, १९७३ चे कलम १२५ मध्ये पालकांना पालनपोषणाबाबत उदरनिर्वाह भत्ता देण्याविषयी तरतुद आहे. या प्रकरणात अर्जदार यांच्याविरूध्द गैरअर्जदार यांनी दाखल केलेला नियमित दिवाणी दावा क्र. ५५/२०२१ हा याच न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. त्याची तारीख आजच असल्यामुळे या अर्जाच्या निर्णयाकामी त्यातील दोन्ही पक्षांच्या वाद कथनांचे

अवलोकन केले  असता असे दिसुन येते की, या प्रकरणातील अर्जदार यांनी ते त्यांच्या दुस-या मुलाकडे राहत असुन ते त्यांचे पालन पोषण करत असल्याबाबत कथन केलेले आहे. गैरअर्जदार यांचे म्हणणे असे आहे की अर्जदार हे त्यांच्या लहानपणापासुन त्यांना सोडुन दुस-या स्त्रीकडे राहत आहेत. पुराव्यामध्ये त्यांचे हे म्हणणे खरे आहे किंवा नाही हे निष्पन्न होईल. मात्र अशा परीस्थीतीत पुराव्याच्या अभावी नेमके कोण कर्तव्य करण्यास चुकले आहे याबाबत सकृतदर्शनी निष्कर्ष काढता येवु शकत नाही. सकृतदर्शनी असे दिसुन येते की अर्जदार यांचा सांभाळ त्यांच्या दुस-या मुलाकडुन केला जात आहे. त्याचप्रमाणे अर्जदार यांच्या नावे मिळकती आहेत. अशा परीस्थीतीत केवळ गैरअर्जदार यांच्यावर अर्जदार यांच्या पालनपोषणाची जबाबदारी आहे असे सकृतदर्शनी दिसुन येत नाही. त्यामुळे या मुद्दयास मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

**६.** सकृतदर्शनी पुराव्याच्या आधारे अर्जदार हे गैरअर्जदार यांच्यावर अवलंबुन आहे असे दिसुन येत नसल्यामुळे या मुद्दयास नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे. त्याचप्रमाणे मुद्दा क्र. ३ बाबत  मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्ज नामंजुर करण्यात येतो.

**ठिकाण : कळमेश्वर**
**दिनांक : १६.०६.२०२३**

**( यो. सु. कवडे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी**
**कळमेश्वर, नागपूर**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer :-R. S. Daware (Gr. III)